नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना देणेबाबत.... (नियतकालीक) (पुणे विभाग)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्र.बदली-२०२४/प्र.क्र.१६२/ई-९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ३१ जुलै, २०२४

संदर्भ :- महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.

शासन आदेश : -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार, नायब तहसिलदार संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नायब तहसिलदाराचे नाव	सद्य कार्यरत पदनाम	बदलीने दिलेली पदस्थापना
१	२	३	४
१	श्री. बालाजी पांडुरंग पुदलवाड	नायब तहसीलदार तथा व्यवस्थापक विठ्ठल रूक्मीणी पंढरपूर, तहसिल कार्यालय पंढरपूर, जि.सोलापूर	नायब तहसीलदार (संगायो), तहसिल कार्यालय माढा, जि. सोलापुर या रिक्त पदावर
२	श्री. संजय सदाशिव विभुते	नायब तहसिलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, जि.सांगली	रजा राखीव नायब तहसिलदार (टपाल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि. सांगली (दि.३१.०७.२०२४ रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या) पदावर
३	श्री. अनिल ठोंबरे	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय इंदापुर, जि.पुणे	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा-कुर्डुवाडी, जि. सोलापुर (श्री कदम यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
४	श्रीमती.सीमा अरुण सोनवणे	नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय वाळवा, जि.सांगली	सद्य पदावर १ वर्ष मुदतवाढ

५	श्री. पंडीत कल्लप्पा कोळी	नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय पंढरपूर, जि.सोलापूर	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय जत, जि. सांगली या रिक्त पदावर
६	श्री. शांताराम नामदेवराव किरवे	नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय जुन्नर, जि.पुणे	निवासी नायब तहसीलदार, तहसिल कार्यालय आटपाडी, जि.सांगली या रिक्त पदावर
७	श्री. विजय मधूकर कवडे	नायब तहसलिदार (महसूल), तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर, जि.सोलापूर	नायब तहसीलदार (महसूल), तहसिल कार्यालय मंगळवेढा, जि. सोलापुर या रिक्त पदावर
८	श्री. मनोज बाळकृष्ण श्रोत्री	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पंढरपूर, जि.सोलापूर	नायब तहसीलदार तथा व्यवस्थापक श्री. विठ्ठल रुख्मिनी मंदिरे समिती पंढरपुर, जि. सोलापुर (श्री. पुदलवाड यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर) प्रतिनियुक्तीने नियुक्ती
९	श्री. विजय आदीनाथ लोकरे	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय माढा, जि.सोलापूर	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय करमाळा, जि. सोलापुर (श्री. जाधव यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
१०	श्री. विजयकुमार नामदेव जाधव	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय करमाळा, जि.सोलापूर	नायब तहसीलदार (महसुल), तहसिल कार्यालय पंढरपुर, जि. सोलापुर (श्री कोळी यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
११	श्री. रियाज अहमद रसूलसाब कुरणे	नायब तहसिलदार, उ.वि.अ.सोलापूर क्र.१, तहसिल कार्यालय सोलापूर, जि.सोलापूर	सद्य पदावर १ वर्ष मुदतवाढ
१२	श्रीमती उदया रघुनाथ देसाई	नायब तहसिलदार, उ.वि.अ.माळशिरस (अकलूज), जि.सोलापूर	नायब तहसीलदार (महसुल), तहसिल कार्यालय सांगोला, जि. सोलापुर या रिक्त पदावर
१३	श्री. रविकिरण रामकृष्ण कदम	नायब तहसिलदार, उ.वि.अ.माढा उपविभाग, कुर्डूवाडी, तहसिल कार्यालय माढा, जि.सोलापूर	नायब तहसीलदार, नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय माळशिरस (अकलूज), जि.सोलापूर (श्रीम. देसाई यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
१४	श्री रविंद्र वसंत कुलकर्णी	नायब तहसिलदार महसूल शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय पुणे, जि.पुणे	सद्य पदावर १ वर्ष मुदतवाढ

१५	श्री. प्रशांत मोतीलाल मिस्त्री	नायब तहसिलदार (संगांयो), तहसिल कार्यालय पुणे शहर, जि.पुणे	सद्य पदावर १ वर्ष मुदतवाढ
१६	श्री. प्रविण ढमाले	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय अपर पिंपरी-चिंचवड, जि.पुणे	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय मावळ-मुळशी, जि. पुणे (श्री. दुलंगे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
१७	श्री. प्रसन्ना पुनाजी केदारी	नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय मावळ, जि.पुणे	नायब तहसीलदार (महसुल), तहसिल कार्यालय जुन्नर, जि. पुणे (श्री. किरवे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
१८	श्री. दत्तात्रय गवारी	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय पुरंदर, जि.पुणे	नायब तहसीलदार (महसुल), तहसिल कार्यालय गगनबावडा, जि. कोल्हापुर या रिक्त पदावर
१९	श्री. आर. बी. दुलंगे	नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मावळ-मुळशी, जि.पुणे	निवासी नायब तहसीलदार, तहसिल कार्यालय गगनबावडा, जि. कोल्हापुर या रिक्त पदावर
२०	श्रीमती. शुभदा सुनिल पंडित (शुभदा वसंत महामुनी)	नायब तहसिलदार, करमणुक कर शाखा, जि.पुणे	सद्य पदावर १ वर्ष मुदतवाढ
२१	श्री.महेश काशिनाथ उबारे	नायब तहसिलदार फौजदारी, जिल्हाधिकारी कार्यालय सातारा, जि.सातारा	नायब तहसीलदार (महसुल), तहसिल कार्यालय कराड, जि. सातारा (श्री देवकर यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
२२	श्रीमती. स्वाती राजेंद्र राऊत	नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय निवडणुक शाखा, जि.पुणे	निवासी नायब तहसीलदार, तहसिल कार्यालय इंदापुर, जि. पुणे (श्री. ठोंबरे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर)
२३	श्री. दामुराजे सावळेराम असवले	नायब तहसिलदार (संगांयो), तहसिल कार्यालय आंबेगांव, जि.पुणे	नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपुर, जि. सोलापुर या रिक्त पदावर

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील. उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरुन या आदेशान्वये शासन स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संबंधितांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना सादर करावा.

३. या आदेशान्वये मुदतवाढ देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना सद्य पदावर दि.३१.०५.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतर सदर अधिकारी बदलीस पात्र राहतील.

४. सदर आदेश हेच कार्यमुक्तीचे आदेश असून संबंधित विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी नव्याने आदेश काढण्याची आवश्यकता नाही. संबंधित अधिकारी बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत deske9-rfd@mah.gov.in या ई-मेलद्वारे/टपालाद्वारे शासनास त्वरित कळवावे.

५. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/का.१४, दि.२३.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्या **अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संबंधित अधिकारी बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी विहित कालावधीत रुजू न झाल्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

८. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिविक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरते व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

९. सदरहू आदेशानुसार बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी व गैरवर्तणूक समजून त्यांचे विरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०.   सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र २०२४०७३१२३१९१८३४१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

SHRIKANT
MADHUKAR MOHITE

Digitally signed by SHRIKANT MADHUKAR MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=5b514d2c3257bba976c5a2de42be8a635bba691c05d1f65ed0ead155a190e90e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5F152866E6FC64E39CF88B9CB27AE0169A65B000039B269233C42B5B77F06B31, cn=SHRIKANT MADHUKAR MOHITE
Date: 2024.08.01 01:22:57 +05'30'

(श्रीकांत म. मोहिते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
६) जिल्हाधिकारी, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर.
७) प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई .
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर.
९) संबंधित आहरण व वितरण अधिकारी.
१०) सर्व संबंधीत अधिकारी (विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्यामार्फत)
११) उप सचिव (ई-९) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) निवडनस्ती, कार्यासन ई-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२